## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ६४३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १५/०९/२०१७

**१) मोटार सायकलच्या धडकेत चिमुरडा जखमी . :–**

दिनांक ०९/०९/२०१७ चे ११.०० वा दर. यातील फिर्यादी सायना महफुज शेख वय २६ वर्ष, रा. सौदागर मोहल्ला भंडारा याचा मुलगा अरशांत महफुज शेख वय ०२.५ वर्ष हा आपले घराचे अंगणात खेळत असता यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल क्र. एमएच ३६-/८५८९ ही हयगयीने निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे मुलाला धडक मारुन जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३८ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पो.स्टे भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) दारुचे नशेत वाहन चालवितांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १४/०९/२०१७ चे १७.०० वा दर. यातील आरोपी हा त्याचे ताब्यातील ट्रक दारु पिवुन दारुचे नशेत चालवितांनी मिळुन आल्याने डॉक्टरी परीक्षण रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १८५ (१) मोवाका . अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मेश्राम पो.स्टे साकोली हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) अचानक प्रकृती खराब झाल्याने औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक १४/०९/२०१७ चे १२.३० वा. दर. यातील मृतक शामराव व्यंकटराव भालाधरे वय ७१ वर्ष, रा. मंगलपांडे वार्ड भंडारा याची अचानक प्रकृती खराब झाल्याने त्यास दिनांक ०८/०९/२०१७ चे २१.३० वा. औषधोपचार कामी सा.रु भंडारा येथे केले असता उपचारा दरम्यान दिनांक १४/०९/२०१७ ला मरण पावल्याने डॉक्टरी मेमो वरुन सरतर्फे फिर्यादी पोना. शहारे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कन्नाके पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) गळफास लावुन इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक १४/०९/२०१७ चे १५.४५ वा. दर. यातील मृतक विजय पतीराम नागलवाडे वय ४५ वर्ष, रा. संजय नगर वार्ड पालांदुर हा बिमार राहत होता. तो आज रोजी आपले नवीन घराचे बांधकामाचे दरवाज्याचे फ्रेमला नायलॉन दोरीने गळफास लावुन मरण पावल्याने फिर्यादी विलास बुधाजी कापसे वय ३३ वर्ष, रा. संजय नगर वार्ड पालांदुर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. शेंडे पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

**५) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक १४/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०२, तीन सिटर वाहनांवरती ०५ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ८५ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

**पोलीस उपअधिक्षक (गृह)**
**भंडारा करीता**
**दुरध्वनी.क्र. ९९२७४१६८१**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.